"शासकीय सेवेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाशी संबंधीत पदांवर नियुक्तीसाठी 'Pharm D' हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ग्राह्य धरण्याबाबत....."

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : धोरण-३०११/(१७५/१९)/तांशि-२
मंत्रालय विस्तार भवन,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक : ०४ सप्टेंबर, २०१९

<u>संदर्भ</u> : १) आरोग्य व कुटूंब कल्याण विभाग, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांची दिनांक १६.०७.२०१९ रोजीची अधिसूचना.
२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचे क्रमांक ४/ आस्था/ से.प्र.नि./ २०१९/ ६१५, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१९ चे पत्र.

<u>प्रस्तावना :</u>

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, भारत सरकार यांच्या शिफारशीनुसार आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १६.०७.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये शासनाच्या सेवेतील ज्या पदांसाठी डी-फार्म(Diploma in Pharmacy)/बी-फार्म(Bachelor of Pharmacy)/एम-फार्म (Master of Pharmacy) अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे अशी शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे त्या पदांसाठी 'फार्म-डी' ही उच्च पदवी धारण करणारी व्यक्ती पात्र ठरविलेली आहे.

२. या संदर्भात केंद्र शासनाच्या दिनांक १६.०७.२०१९ च्या संदर्भाधीन अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख करण्यात आला आहे :

"The Central Government on the recommendations of the Pharmacy Council of India constituted under Section ३ of Pharmacy Act, १९४८ (८ of १९४८), decided that a person holding the Pharm. D qualification being higher qualification shall automatically become eligible for appointment to various posts where a person holding Diploma in Pharmacy or Bachelor of Pharmacy or Master of Pharmacy qualifications eligible to be appointed."

३. आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाच्या उपरोक्त अधिसूचनेनुसार राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाशी संबंधीत पदांवरील नियुक्तीसाठी 'फार्म डी' अभ्यासक्रम पात्र ठरविण्यात आलेला असून त्याअनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाच्या दिनांक १६.०७.२०१९ च्या अधिसूचनेमधील तरतुदीनुसार राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक संस्थांमधील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाशी संबंधीत ज्या पदांसाठी डी-फार्म(Diploma in Pharmacy)/बी-फार्म(Bachelor of Pharmacy)/एम-फार्म (Master of Pharmacy) अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे अशी शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे त्या सर्व पदांसाठी ‘फार्म-डी’ ही पदवी धारण करणारी व्यक्ती उच्च अर्हताधारक व्यक्ती म्हणून पात्र समजण्यात यावी. त्यामुळे डी.फार्म./बी.फार्म./एम.फार्म या शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना संचालनालयाच्या अखत्यारीतील ज्या पदांच्या नियुक्त्यांसाठी ग्राह्य धरण्यात येते अशा पदांच्या नियुक्त्यांकरिता फार्म.डी. शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार पात्र असतील.

२. राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक संस्थांमधील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाशी संबंधीत ज्या पदांसाठी डी-फार्म(Diploma in Pharmacy)/बी-फार्म(Bachelor of Pharmacy)/एम-फार्म (Master of Pharmacy) अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे अशी शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे त्या सर्व पदांसाठीचे सेवाप्रवेश नियम सुधारित करण्यासाठीचा प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालनालय शासनास सादर करेल.

सदरचे सेवाप्रवेश नियम सुधारित होऊन अधिसूचित होईपर्यंतच्या कालावधीमध्ये या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०९०४१६४११५४६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Jagdeorao Tidke

Digitally signed by Satish Jagdeorao Tidke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=abbed596652773468508d937a99472988ebdda28db8c543b79abe527c99646f6, cn=Satish Jagdeorao Tidke
Date: 2019.09.06 11:47:36 +05'30'

(सतिश ज. तिडके)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, एमटीएनएल बिल्डींग, कुपरेज, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - २१
५. मा. मुख्यसचिव, यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा. मंत्री/राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९. कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
१०. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे,
११. कुलसचिव, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई.
१२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, ४९, अली यावर जंग मार्ग, सदगुरू कॉलनी, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई -५१.
१३. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण(संचालनालयामार्फत)
१४. अवर सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१५. कार्यासन अधिकारी, तां.शि.-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. कार्यासन अधिकारी, तां.शि.-७, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती, तांशि-२, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.